**कृपया प्रसिध्दीसाठी** दि. २६ डिसेंबर २००८

मुंबई, शुक्रवार : मुंबईवर झालेल्या हल्ल्यास एक महिनाा पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या हल्ल्यात वीरमरण प्राप्त झालेले पोलीस व लष्करी अधिकारी, कर्मचारी तसेच निष्पाप नागरिक यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील जवळजवळ ४० वस्त्यांतून ४०० हून अधिक कुष्ठपीडित स्त्री–पुरुष 'महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटने'च्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आझाद मैदान येथे एकत्रित आले होते.

कुष्ठपीडितांच्या मागण्यांचा अनेक वर्षे सरकारकडे पाठपुरावा करणारे माजी केंद्रीय मंत्री श्री.राम नाईक या कार्यक्रमात प्रमुख अतिथी या नात्याने उपस्थित होते. ''शरीराने अपंग असले, तरी मन मात्र राष्ट्रभावनेने भारलेले आहे,'' अशा शब्दात जमलेल्या सर्व कुष्ठपीडित बंधुभगिनींचे कौतुक करुन ते पुढे म्हणाले, ''या बांधवांनी या कृतीद्वारे सर्वांनाच राष्ट्रप्रेमाचा धडा दिलेला आहे.'' यावेळी बोलतांना या अनुकरणीय कार्यक्रमासाठी गेटवे ऑफ इंडियाच्या जागेवर परवानगी नाकारण्याच्या पोलिसांच्या निर्णयासंबंधी आपली खंत व्यक्त केली. याशिवाय कुष्ठपीडितांच्या विकासासाठी जीवनभर प्रयत्न करणाऱ्या स्वर्गीय बाबा आमटे यांनाही त्यांच्या जयंती दिनानिमित्त आदरांजली वाहिली.

महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रकाश कुलकर्णी यांनी संघटनेच्या आवाहनास प्रतिसाद देऊन मोठ्या संख्येने आल्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. कुष्ठपीडितांसाठी काम करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.भीमराव मधाळे (बोरीवली), डॉ.उदय ठकार (पनवेल), श्रीमती अहिल्याबाई कुडनूर (अंबरनाथ), वत्सलाबाई संगीत (दापोडी), सर्वश्री शांताराम भोईर (ठाणे), यदुनाथ गायकवाड (दापोडी), बळीराम तांबडे (तुर्भे), शशिकांत देसाई (ठाणे), पन्नालाल निकम (पुणे) यांचीही भाषणे झाली. सूत्रसंचालन सचिव श्री.भूपाल फिरगाणे (कल्याण) यांनी केले.

कार्यालय मंत्री